| | |
|---|---|
| MHJN020005472013 | नि.दि.दा.क्र.२२१/२०१३<br>निलावती व ईतर–वि–शासन व ईतर |

## निशाणी क्र.१९५ व १९६ वरील संयुक्तीक आदेश

(दि.०७.०५.२०२६ रोजी घोषीत)

. वादी यांनी विक्री–पत्र क्र.८८/२०१७ ची प्रमाणित प्रत दाखल करण्याची परवानगी,सदर विक्री–पत्रास निशाणी क्रमांक देण्यात येऊन ते पुराव्यात समाविष्ट करण्यासाठी प्रस्तुतचे अर्ज दाखल केलेले आहेत.

२. वादी यांच्या कथनानुसार त्यांनी नि.क्र.५९ नुसार दिवाणी प्रक्रिया संहिता,आदेश १ नियम १०(२) आणि आदेश ६ नियम १७ प्रमाणे संजय भिसे यांना प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणे आणि प्रतिवादी क्र.६–हौशल्याबाई यांनी संजय भिसे यांच्या नावे नोंदवून दिलेले विक्री–पत्र क्र.८८/२०१७ हे बेकायदेशीर घोषीत करण्याची परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता व तो मंजूर झालेला आहे. वादीने सदर अर्जासोबत नोंदणीकृत विक्री–पत्र क्र.८८/२०१७ ची छायांकीत प्रत दाखल केल्यामुळे त्यास निशाणी क्रमांक देण्यात आलेला नाही. त्यामुळे वादीने सदरहु अर्जासोबत विक्री–पत्र क्र.८८/२०१७ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. वादीने त्यांचा तोंडी पुरावा बंद करण्याबाबत नि.क्र.१६५ वर

पुरशिष दाखल केली,परंतु वादी विक्री–पत्र क्र.८८/२०१७ च्या प्रमाणित प्रती व्यतिरीक्त कोणताही तोंडी पुरावा देऊ ईच्छीत नाही. करीता विक्री–पत्र क्र.८८/ २०१७ ची प्रमाणित प्रत दाखल करण्याची परवानगी मंजूर करण्यात यावी.

३. वादीचे पुढे असेही कथन की,त्यांनी विक्री–पत्र क्र.८८/२०१७ ची प्रमाणित प्रत दाखल केलेली असून नि.क्र.५५ वर मुद्दे कायम केलेले आहेत. सदर मुद्यांमध्ये अतिरीक्त मुद्या विक्री–पत्र क्र.८८/२०१७ बाबतचा मुद्या समाविष्ट केलेला आहे. प्रतिवादी क्र.९–संजय भिसे यांच्या नावे विक्री–पत्र असून त्यांनी नि.क्र.८२ वर लेखीजबाब दाखल केला असून त्यामध्ये प्रतिवादी क्र.६ ने प्रतिवादी क्र.९ यांच्या नावे नोंदवून दिल्याचे मान्य केलेले आहे. तसेच सदर विक्री–पत्र प्रतिवादी क्र.९ च्या ताब्यात असून ते न्यायालयात दाखल केले नाही. करीता विक्री–पत्र क्र.८८/२०१७ च्या प्रमाणित प्रतीस निशाणी क्रमांक देण्यात येऊन पुराव्यात वाचण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

४. प्रतिवादी क्र.८ यांनी नि.क्र.१९५ वर त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन कथन केले की,सर्व पक्षांचा संपूर्ण पुरावा आणि अंतिम युक्तिवाद पूर्ण झालेला आहे. वादी यांनी कोणत्याही अतिरिक्त पुराव्यासाठी अर्ज सादर केलेला नाही. वादीने सादर केलेला पुरावा स्वीकारण्यासाठी कोणतेही वाजवी आणि

संयुक्तीक कारण नमूद केलेले नाही. करीता प्रस्तुतचा अर्ज जास्तीत जास्त खर्च रक्कम आकारुन फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

५. प्रतिवादी क्र.६ यांनी नि.क्र.१९५ वर त्यांचे लेखी म्हणणे सादर केले की,प्रस्तुत प्रकरणात संपूर्ण पुराव्यासह उभयपक्षांचा मौखीक युक्तीवाद होऊन वादीने पुरावा बंद केलेला आहे. प्रस्तुत अर्जात कोणतेही कायदेशीर कारण नमूद केले नसून सदर अर्ज कायदयाच्या कक्षेत येत नाही. करीता प्रस्तुतचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

६. प्रतिवादी क्र.१ ते ५,७ व ९ यांनी सदर नि.क्र.१९५ व १९६ बाबत कोणतेही लेखी म्हणणे सादर न केल्यामुळे प्रस्तुत अर्ज त्यांच्या लेखीजबाब शिवाय पुढे चालविण्यात आला.

७. अभिलेखावरील अर्ज आणि कागदपत्रांचे अवलोकन केले.

८. वादी,प्रतिवादी क्र.६ आणि ८ यांच्या तर्फे विधिज्ञांचा मौखीक युक्तीवाद ऐकला.

९. वादी यांनी मौजे बाजीउम्रद,ता.जि.जालना येथील गट नं.३०३ एकुण क्षेत्रफळ ०५हे.०२आर जमीनीचे मयत देविदास गिरजुबा डोंगरे यांचे कायदेशीर वारस असल्याने त्यांना वाद मिळकतीचे मालक व ताबेदार,प्रतिवादी

क्र.६ यांचा वाद मिळकतीत कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नसल्याचे घोषीत करणे,प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी प्रतिवादी क्र.६ च्या नावे मौजे बाजीउम्रद येथील गट नं.३०३ क्षेत्र ०१हे.६०आर व गट नं.२९१ क्षेत्र ८१आर जमीनीबाबत झालेल्या नोंदी कमी करणे,प्रतिवादी क्र.३ यांनी प्रतिवादी क्र.६ यांचेशी संगनमत करुन दिलेला बेकायदेशीर निर्णय आणि त्या अनुषंगाने झालेल्या फेरफार नोंदी वादींच्या हक्कावर बंधनकारक नाही,तसेच मनाई हुकूम मिळण्यासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

१०. सदर संचिकेचे अवलोकन केले असता वादी व प्रतिवादी यांनी साक्षीपुरावा देऊन पुरावा बंद केलेला आहे. सदर बाब जरी सत्य असली तरी वादीच्या कथनानुसार त्यांनी विक्री–पत्र क्र.८८/२०१७ ची छायांकीत प्रत दाखल केली असल्याने त्यास निशाणी क्रमांक देण्यात आलेला नाही. परंतु वादीने पुराव्याच्या अनुषंगाने नि.क्र.१९५ अन्वये विक्री–पत्र क्र.८८/२०१७ ची प्रमाणित प्रत दाखल करण्याच्या परवानगीसह ते पुराव्याकामी वाचण्यात यावी अशी विनंती केलेली आहे. वादीच्या कथनानुसार नि.क्र.१९५ सोबत विक्री–पत्र क्र.८८/२०१७ ची प्रमाणित प्रत दाखल करुन त्यास निशाणी क्रमांक दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. परंतु प्रतिवादी यांना सदर विक्री–पत्राबाबत काही पुरावा द्यावयाचा असल्यास त्यांना संधी प्राप्त

होऊन ते पुरावा सादर करु शकतात. प्रस्तुत प्रकरणात कायदेशीर व तांत्रीक मुद्ये राहु नये,तसेच प्रकरणाचा निर्णय गुणदोषावर होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज खर्च रक्कम रु.१,०००/–जिल्हा विधी प्राधिकरण,जालना यांच्या कार्यालयात भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १ | नि.क्र.१९५ व १९६ वरील संयुक्तीक अर्ज खर्च रक्कम रु.१,०००/–जिल्हा विधी प्राधिकरण, जालना यांचे कार्यालयात भरणा करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतात. |
| २ | नि.क्र.१९५ आणि १९६ वरील अर्जानुसार विक्री–पत्र क्र. ८८/२०१७ ची प्रमाणित प्रत दाखल करण्याची परवानगी मंजूर करण्यात येऊन सदर विक्री–पत्रास निशाणी क्रमांक देण्यात यावा. |
| ३ | आदेशाप्रमाणे नि.क्र.१९५ व १९६ वरील अर्ज निकाली काढण्यात येतात. |

ASHVINI PRAVIN DIWAN

Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.05.07 17:21:44 +0530

(अश्वीनी प्र.दिवाण)

दि.०७.०५.२०२६

दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)

जालना

**प्रमाणपत्र**

मी निवेदन करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : शिरीष दि. देशमुख |
| न्यायालयाचे नाव | : दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), जालना. |
| अपलोड केल्याची तारीख | : दि.०७.०५.२०२६. |

लघुलेखक(म.)